महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

# DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH

Govt. Dental College & Hospital Building, St.George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel.No. +91-22-22620361-65/22652257/59
Fax:+91-22- 22620562/22652168
Telegram:" MEDUCATNSEARCH"
Website :http://www.dmer.org

क्र. एनयुआर/एम.एस्सी.(न)/जाहिरात/३/ई/२०१२

दिनांक : ०६/०९/२०१२

## ''एम.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी निवडकरावयाच्या उमेदवारांसाठीची प्रवेश प्रक्रिया''

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. एनयुआर-१००/प्र.क्र.२४८/शिक्षण-२, दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ अन्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात एम.एस्सी. (नर्सिंग) या अभ्यासक्रमासाठी निवड करावयाच्या उमेदवारांसाठी सामाईक प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी निर्देशित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने (१) परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई (२) एस.टी.एस. सिंहगड कॉलेज ऑफ नर्सिंग, पुणे (३) कस्तुरबा कॉलेज ऑफ नर्सिंग, कस्तुरबा हेल्थ सोसायटी, वर्धा या संस्थेमधील प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर सामाईक परिक्षेकरिता आवश्यक असणाऱ्या बाबी उदा. शैक्षणिक अर्हता, पात्रता, सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, अटी व शर्ती, इत्यादी याबाबत सविस्तर माहिती अर्जासोबत देण्यात येणाऱ्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आलेली असून उमेदवारांनी माहिती पुस्तिकेचे गांभीर्यपूर्वक वाचन करून आपले अर्ज सादर करावेत.

अर्ज व माहिती पुस्तिका खालील ठिकाणी विकत मिळतील व तेथेच जमा करता येईल.

(अ) परिचर्या शिक्षण संस्था, सर ज.जी. समूह रुग्णालय आवार, भायखळा, मुंबई - ८.
(ब) एस.टी.एस. सिंहगड कॉलेज ऑफ नर्सिंग, पुणे
(क) कस्तुरबा कॉलेज ऑफ नर्सिंग, कस्तुरबा हेल्थ सोसायटी, वर्धा

माहिती पुस्तिका व अर्जाची किंमत खुल्या वर्गातील उमेदवारांकरिता रुपये १०००/- व मागासवर्गीय उमेदवारांकरिता रुपये ८००/- राहील. सदरील रक्कम "DMER MUMBAI" Payable at Mumbai यांच्या नावे धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) स्वीकारली जाईल व ती ना परतावा असेल, अर्ज स्वीकारताना जात प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक राहील. अर्ज व माहिती पुस्तिका दिनांक १०/०९/२०१२ ते १७/०९/२०१२ या कालावधीत वर नमूद केंद्रावर कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध राहील. परीक्षा रविवार दिनांक २३/०९/२०१२ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत घेण्यात येईल. परीक्षा ही मुंबई मध्ये घेण्यात येणार असून परीक्षेचे केंद्र प्रवेश पत्रावर नमूद असेल.

**उमेदवारांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे व पडताळणी समितीकडून प्रथमदर्शनी प्रमाणपत्र पडताळणी करून त्यांना पात्र/अपात्र ठरविण्यात येईल व पात्र ठरविलेल्या उमेदवारांनाच परीक्षा देण्याची परवानगी देण्यात येईल.**

सही/
डॉ. पी.एच. शिनगारे,
सक्षम प्राधिकारी व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई